## अटी व शर्ती

१. सदर निविदा ११ महिन्यांच्या कंत्राटी तत्वावर कामगार जसे की, सुरक्षारक्षक / पहारेकरी, माळी व कुशल कंत्राटी कर्मचारी कामावर पुरविणे करिता आहे. समाधान कारक सेवा निदर्शनास आल्यास पुढे नवीन अटी व शर्तीसह मुदत वाढ देण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील.

२. या कंत्राटाद्वारे उपरोक्त प्रमाणे नियुक्त कर्मचारी यांना शासकीय व इतर लागू असलेले विविध निमशासकीय संस्थाचे नियमाप्रमाणे दरमाह वेळेवर वेतन देण्याची व सर्व प्रकारचे कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व असे नियुक्त कर्मचाऱ्याच्या सेवेमधील, कोणत्याही प्रकारच्या न्यायालयीन आदेशा प्रमाणे किंवा सक्षम अधिकाऱ्याच्या आदेशाच्या अंमलबजावणीमुळे येणारी आर्थिक जबाबदारी हि महाविद्यालयाची नसुन कंत्राटदाराची राहील.

३. सदर कंत्राटाद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांच्या कामाचे नियोजन कंत्राटदारास प्राचार्यांच्या संमतीने करावे लागेल, तसेच याद्वारे नियुक्त १४ सुरक्षा रक्षकामधे महाविद्यालयाच्या पुर्ण परिसराची / परीसरातील मालमत्तेची, विद्यार्थ्यांची, अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची सुरक्षिततेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४. याद्वारे नियुक्त कर्मचाऱ्याच्या सेवा असमाधानकारक वाटल्यास प्राचार्याच्या आदेशान्वे कर्मचारी बदलणे कंत्राटदारास बंधनकारक राहील तसेच नवीन कर्मचारी नियुक्त करते वेळी पोलीस पडताळनी करणे सक्तीचे आहे व त्याचा पुरावा महाविद्यालयाला नियुक्त करण्याच्या आधी सादर करणे बंधनकारक राहील.

५. महाविद्यालयाच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याने कोणत्याही कारणास्तव (मोडतोड, चोरी वैगरे) मालमत्तेचे जर आर्थिक नुकसान झाले तर सदर नुकसान भरपाईची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याने सदर भरपाई त्याच्या देयकामधून वसूल केल्या जाईल. तसे शक्य नसल्यास त्यांना स्वतंत्रपणे नुकसान भरपाईची भरणा त्वरित करावा लागेल.

६. याद्वारे नियुक्त कर्मचाऱ्याचे वय २२ ते ४० वर्षामधील असणे आवश्यक राहील तसेच नियुक्त कर्मचारी शारीरिक दृष्ट्या धडधाकट, चपळ व वैद्यकिय दृष्ट्या सदर कामे करण्यास सक्षम असल्याचे तसेच चारित्र्यसंपन असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. या कामा दरम्यान नियुक्त कर्मचाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या जिवितहानी / इजा पोहचल्यास, त्याची सर्व जबाबदारी महाविद्यालयाकडे न राहता कंत्राटदाराकडे राहील.

७. याद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांना ओळखपत्र, गणवेश व इतर आवश्यक सर्व साहित्य जसे कि, बॅटरीज, माळी कामाकरिता आवश्यक साहित्य पुरवणे, गस्त घालतेवेळेस मोबाईल सेवा सुरु असणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

८. महाविद्यालयामधे विद्यार्थ्याचे बेशिस्तपणा होऊ नये व इतर कोणत्याही बेकायदेशीर संघटनात्मक कृती परिसरामध्ये होऊ नये या करिता आवश्यक ती सर्व दक्षता व अवरोधतात्मक कार्यवाही करण्याची जवाबदारीही कंत्राटदाराची व त्यांचे द्वारे नियुक्त सुरक्षा रक्षकांची राहील.

९. महाविद्यालय परिसरातील / इमारती मधील पथदिवे बंद करणे, विविध इमारतींच्या मुख्य प्रवेशाच्या चाब्याची देवान घेवाण करणे इत्यादी व इतर अनुषंगिक प्राचार्यांनी निर्देशित केलेली कामे सुरक्षा रक्षकांना करणे बंधनकारक राहील.

१०.परिसरामध्ये मादक, अंमली पदार्थ व अनुचित कृती होऊ न देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असुन या करिता आवश्यक पोलीस कार्यवाही प्राचार्यांच्या संमतीने करणे बंधनकारक राहील. अशा कृतीमधे कोणीही नियुक्त कंत्राटी कर्मचारी आढळल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यास काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

११.सदर निविदे करिता खालील प्रमाणे दस्तावैज असणाऱ्या कंत्राटदाराचे निविदा वैध असेल. या व्यतिरिक्त सादर करण्यात येणाऱ्या दस्तावेजाची वैधता ठरविण्याचा अधिकार अंतिमतः या करिता नियुक्त समितीकडे राहतील.

### आवश्यक दस्तावेज

अ) संस्थेचे नोंदणीपत्र.

आ) वार्षिक उलाढाली संदर्भातील दस्तावेज ( मागील – ०३ वर्ष ).

इ) सेवा कर / जी. एस. टी. भरल्या संदर्भातील दस्तावेज ( मागील – ०३ वर्ष ).

ई) सुरक्षा रक्षक सेवा सुरु असेल अशा कमीत कमी दोन ठिकाणाचे दस्तावेज. ( Work order / Experience)

उ) या क्षेत्रात ०५ वर्षाची सेवा पुरविल्या संदर्भातील कागद पत्रे. ( चांगल्या प्रकारे पार पडलेली)

ऊ) विविध ठिकाणी वर्तमान परिस्थितीत पुरविण्यात येत असलेल्या मनुष्यबळाची संख्या व त्या संबंधीचे प्रमाणपत्र.

ऋ) जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र.

ऌ) मनुष्यबळ पुरविण्या संदर्भातील नोंदणी प्रमाणपत्र.

ऍ) स्थानिक पोलीस विभागातील परवानाधारक कंत्राटदार असल्याचे प्रमाणपत्र.

ऎ) भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र / भरत असल्यास मागील ०३ वर्षाचा तपशील.

ए) ESIC चे नोंदणी प्रमाणपत्र.

१२.उपरोक्त अटी व शर्तींच्या अधीन राहून कंत्राटदारास या कंत्राट कालावधीकरिता एकच दर राहील या प्रमाणे एकून प्रति दिवस प्रती कार्मचारी दर ( सर्व प्रकारच्या करासह) एका पाकिटात नमुद करून सिलबंद पाकिटावर दरपत्रक असे नमुद करावे व दुसऱ्या पाकिटामध्ये आवश्यक सर्व दस्तावेज सादर करावे. त्या सिलबंद पाकिटात ठळक अक्षरात दस्तावैज, कंत्राटदाराचे नाव नमुद करावे. कोणत्याही कंत्राटदाराकडून सदर दोन पाकिटे, वरील प्रमाणे नमुद न करता किंवा त्यामधील दस्तावेज नमुद प्रमाणे नसल्यास निविदा अवैध ठरविण्यात येईल.

१३.निविदा प्रक्रिया व कंत्राटाबाबत न्यायालयीन प्रकरण निपटारा प्रथमतः चंद्रपूर येथील न्यायालयातच करण्यात येईल.

१४.निविदेमधील दर सरकारी कामगार आयुक्त यांनी निर्धारित केलेल्या किमान दरापेक्षा कमी असल्यास, निविदा अवैध ठरविण्याचे अधिकार या करिता नियुक्त समितीकडे असतील.

१५. जर कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यात आली तर कंत्राटदारास एक महिन्याचे वेतन सुरक्षा अनामत म्हणुन या अन्वये कंत्राट स्विकारण्याच्या दिनांका पासुन ०५ दिवसात भरणा करून या अटी व शर्तीचा करारनामा करावा लागेल व लगेचच ०५ दिवसात कंत्राट सेवा पुरवाव्या लागतील.

१६. अतिरिक्त सुरक्षा रक्षक / कुशल , अकुशल कर्मचारी आवश्यकता भासल्यास दिलेल्या दराने बंधनकारक राहील.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
चंद्रपूर

अंतिम निविदा बहालकरण्याकरिता ~~प्रा~~ पात्र निविदा-कारांच्या ( पुरवठादारांच्या ) खालील बाबींचा प्रामुख्याने विचार केला जाईल. (1) उलाढाल (2) सुरक्षा रक्षक संख्या (3) कामाचा अनुभव (4) दर सुरक्षारक्षक दर माळी , दर कुशल कामगार